**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०९ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी आज मतदान संपन्न, मतमोजणीला सुरवात.**
2. **'नमो शेतकरी योजने'चा सातवा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते वितरित, राज्यातील ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकरी लाभान्वित.**
3. **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनिस्सारण प्रकल्पासाठी २६८ कोटी रुपये कर्ज उभारणीसाठी राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी.**
4. **रस्ते आणि वृक्ष लागवडी संदर्भात केलेल्या व्यापक कामांसाठी अमरावती शहराला स्वच्छ वायू सर्वेक्षण पुरस्कार.**

उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक

देशाच्या १७व्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांद्वारा आज संध्याकाळी पाच वाजेपर्यंत मतदान करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी पंतप्रधान एच.डी.देवेगौडा, उपसभापती हरिवंश, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्यासह अनेक सदस्यांनी मतदान केलं. सकाळी दहा वाजता मतदानाला सुरवात झाली. मतमोजणीला सायंकाळी सहा वाजेपासून सुरूवात होत आहे. या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार, महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन आणि इंडिया आघाडीचे उमेदवार सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांच्यात थेट लढत आहे. लोकसभेचे ५४२ आणि राज्यसभेचे २३९ सदस्य, असे एकूण ७८१ खासदार या निवडणुकीसाठी मतदान करणार आहेत. या निवडणुकीत उमेदवाराला विजयासाठी किमान ३९१ मतांची आवश्यकता आहे. दरम्यान, या निवडणुकीत तटस्थ राहण्याचा निर्णय बिजू जनता दल आणि भारत राष्ट्र समिती या दोन पक्षांनी घेतला आहे.

नमो शेतकरी-फडणवीस

राज्य सरकारच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या सातव्या हप्त्याचं आज वितरण करण्यात आलं. या योजनेअंतर्गत केंद्र सरकारच्या सहा हजार रुपये मदतनिधीला राज्य सरकारचे सहा हजार रुपये जोडून देण्यात येतात. तीन टप्प्यात या रक्कमेचं वितरण करण्यात येतं. मुंबईत मंत्रालयात आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री तसंच उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पात्र शेतकऱ्यांना हा हप्ता वितरित करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हप्ता वाटपाची माहिती दिली -

*जवळपास 91 लाख 65 हजार 156 शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जवळपास 1892 कोटी आणि 61 लाख रुपये हे आपण आज जमा केलेले आहेत आणि मला विश्वास आहे की ही जी काही मदत आपण करतो त्याच्या पाठीमागचा आपला हेतु हा असतो की शेतीच्या कामामध्ये जे काही छोटे मोठे खर्च शेतकर्यांना येतात किंवा अनुषंगिक खर्च येतात त्याच्यामध्ये त्यांना मदत मिळाली पाहिजे आणि निश्चितपणे या महासन्मान निधीचा सर्व शेतकरी सातत्याने स्वागत करतात.*

केंद्र शासनाने सुरु केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनाच्या धर्तीवर राज्य शासनाने ही योजना सुरू केली आहे. यामध्ये पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देऊन शेती खर्चाला हातभार लावण्याचा उद्देश आहे. या सातव्या हप्त्यामध्ये एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ या महिन्यांचे अनुदान लाभार्थ्यांना देण्यात आले. ज्या शेतकरी लाभार्थ्यांचा प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत समावेश आहे त्या सर्वांना राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ मिळाला आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर हे अनुदान शेतक-यांसाठी महत्वाचे ठरणार आहे. .

बांबूविषयक धोरण

राज्याचं पहिलं बांबूविषयक धोरण येत्या १७ सप्टेंबरला जाहीर होईल असं उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काल रत्नागिरीत सांगितलं. बांबू शाश्वत पीक असून योग्य नियोजनासह बांबू लागवड केल्यास शेतकऱ्यांना दरमहा ३० ते ४० हजार रुपयांचं अतिरिक्त उत्पन्न मिळू शकतं असं ते म्हणाले.

वस्तू आणि सेवाकर

वस्तू आणि सेवाकर परिषदेनं ५६व्या बैठकीत वस्तू आणि सेवाकर रचनेच्या सु-सूत्रीकरणाला मान्यता दिली असून यापुढे फक्त ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरांत जी.एस.टी.कर आकारणी होईल. या सुधारणेचं स्वागत व्यापारी, सामान्य नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर करत आहे. ऐकूया Confederation of All India Traders चे राष्ट्रीय अध्यक्ष, बी.सी.भरतीया यांची प्रतिक्रिया-

*सरकार द्वारा जीएसटी की नई दरें व्यापार में क्रांति के रूप में आएगी। नंबर ऑफ स्लैब जो कर की इतनी सारी दरें थीं। ये बहुत कम हो गई। अब दो ही दरें हो गई। हिसाब रखने में भी अच्छा हो गया। कीमतें कम हो गई। दरें कम होने से हमारा जो भांडवल लगता था उसमें वो भी कम हो जाएगा और व्यापार बढ़ जाएगा।चीजें सस्ती हो जाएगी । गृहणियां और सब लोग व्यापार में आयेंगे। इस वजह से भारत देश की अर्थव्यवस्था और मजबूत होगी और अंतर्राष्ट्रीय स्तर पर भी हम लोगों का अच्छा माल बिकेगा, ऐसी मुझे संभावना लगती है।*

छगन भुजबळ

राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात 2 सप्टेंबर रोजी एक शासन निर्णय जारी केला आहे. मराठा समाजाला कुणबी, मराठा- कुणबी, कुणबी-मराठा प्रमाणपत्र देण्यासाठी हा शासन निर्णय काढण्यात आला आहे. मात्र या शासन निर्णयामध्ये अनेक शब्दांवर ओबीसी संघटनांचा आक्षेप आहे. या शासन निर्णयामधील काही शब्दांमुळे सरसकट मराठा समाज हा ओबीसीमध्ये येऊ शकतो अशी भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे ओबीसी मधील लहान लहान घटकाचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे या शासन निर्णयाबाबत सरकारने स्पष्टता द्यावी अशी मागणी राज्याचे मंत्री तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

मंत्रीमंडळ निर्णय

उपसा जलसिंचन योजनांसाठी वीज दर सवलतीला मार्च २०२७ पर्यंत मुदत वाढ, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनिस्सारण प्रकल्पासाठी २६८ कोटी रुपये कर्ज उभारणी यांसह अनेक महत्वपूर्ण निर्णय आजच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले. वीज दर सवलतीला मुदत वाढ मिळाल्यामुळे अतिउच्चदाब, उच्चदाब आणि लघुदाब उपसा जलसिंचन अशा सर्व प्रकारच्या १ हजार ७८९ योजनांचा शेतकरी सभासदांना लाभ होणार आहे. तर नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजने अंतर्गत पहिल्या टप्प्यात हुडकोकडून २००० कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास मान्यता देण्यात आली असून यात नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनिस्सारण प्रकल्पासाठी २६८ कोटी रुपये कर्ज उभारणी करण्यात येणार आहे. राज्यातील विविध महापालिका क्षेत्रात केंद्र पुरस्कृत अमृत दुसरा टप्पा अभियान, स्वच्छ भारत अभियानदुसरा टप्पा, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान आणि इतर केंद्र तसंच राज्य स्तरावरील पायाभूत सुविधांचे प्रकल्प राबविण्यात येत आहेत. हे प्रकल्प निधी अभावी रखडू नयेत यासाठी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना आणि त्यातून निधी उभारण्याची कार्यपद्धती निश्चित करून देण्यात आली आहे. याशिवाय अकोला जिल्ह्यातील घोंगा आणि मुर्तिजापूर तालुक्यातील कानडी इथल्या लघु पाटबंधारे प्रकल्प योजनांच्या दुरुस्ती खर्चाची तरतूद करण्यास देखील मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामुळे मुर्तिजापूर तालुक्यातील सिंचन क्षमतेत वाढ होणार असून शेतीला पाणी मुबलक प्रमाणात मिळणे शक्य होणार आहे.

स्वच्छ वायू सन्मान

रस्ते आणि वृक्ष लागवडी संदर्भात केलेल्या कामांसाठी अमरावती शहराला स्वच्छ वायू सर्वेक्षण पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आलं आहे. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाच्या वतीने आज स्वच्छ वायू सर्वेक्षण पुरस्कार

तसंच पाणथळ शहर सन्मान समारंभ २०२५ आयोजित करण्यात आला. मंत्रालयाने राबविलेल्या राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम (NCAP) अंतर्गत १३०शहरांमध्ये राबवलेल्या स्वच्छ वायू सर्वेक्षणात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या शहरांना सन्मानित केलं गेलं. दहा लाखांपेक्षा अधिक, तीन ते १० लाख आणि तीन लाखांपेक्षा कमी अशी लोकसंख्येनुसार पुरस्कारांची तीन गटांत विभागणी करण्यात आली असून तीन ते १० लाख लोकसंख्या असलेल्या गटात अमरावती शहराला प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे. अमरावती शहरात रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा केली गेली असून, शहरात एकूण ३४० किलोमीटर रस्त्यांचं डांबरीकरण करण्यात आलं आहे. तसच, ५३ उद्यानांमध्ये व्यापक वृक्षलागड करण्यात आली आहे. याशिवाय, १९ एकर पडिक भूमीचे रूपांतर घनदाट जंगलामध्ये करण्यात आलं आहे.

हवामान

विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या हवामान सामान्य राहणार असून परवा 11 सप्टेंबरला गोंदिया, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने दिला आहे. परवा नागपूर, वर्धा, वाशिम, चंद्रपूर, भंडारा या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देखील जारी करण्यात आला आहे. दरम्यान, येत्या काही तासात विदर्भातील चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

******